**कलम ४ (१) (ब ) (vii)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील वैद्यकिय विभागामध्ये दस्तऐवजांची वर्गवारी

| अ. क्र. | सल्ला मसलीतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | कोणत्या अधिनियम/नियम/परिपत्रकाव्दारे | पुनरावृत्तीकाल |
|---|---|---|---|---|
| १ | समस्या निवारण | यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात नागरिकांना रूग्णसेवेबाबत सुचना व तक्रारी यासाठी सुचना/तक्रारपेटी ठेवण्यात आलेली आहे. प्राप्त झालेल्या सुचनानुसार आवश्यक कार्यवाही करणे व प्राप्त झालेल्या तक्रारांची योग्य ती दखल घेण्यात येते. समस्या निवारण दिनी प्राप्त झालेल्या सुचना व तक्रारी यांचे निवारण करणे | शासनाने जाहीर केलेल्या लोकशाही दिन या धर्तीवर आधारीत मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार /नागरिकांची सनद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार | ------- |
| २ | माहिती अधिकार२००५ | केंद्र शासनाने जाहीर केलेल्या कायद्यानुसार ज्या नागरिकांना/संस्थेला अथवा कोणासही माहिती घ्यावयाची असेल तर विहित नमुन्यातील अर्ज व त्यावर र.रू.१०/-चा कोर्ट फी स्टॅम्प लावून आवश्यक ती माहिती मागविता येते.असा अर्ज प्राप्त झाल्यावर तो संबंधित विभागाकडे ठराविक कालावधी देऊन कार्यवाहीसाठी पाठविला जातो.पुर्ण कार्यवाही झाल्यावर या विभागाकडे प्राप्त झालेली माहिती योग्य आहे अथवा नाही याची खातरजमा माहिती अधिकारी करून संबंधित अर्जदाराला देणेत येते. या उपरही ज्या अर्जदारास माहितीबाबत साशंकता निर्माण झालेली असेल तो अर्जदार अपिलीय अधिका-यांकडे र.रू.२०/- कोर्ट फी स्टॅम्प लावून पुन्हा अपिल करू शकतो. अशा प्रसंगी अपिलीय अधिकारी सुनावणी घेऊन त्यावर निर्णय देतात. | केंद्र शासनाने जाहिर केलेला माहिती अधिकार २००५ | ------- |
| ३ | राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम | राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचे धोरण शासन पातळीवर ठरविण्यात येते व त्या अनुषंगाने लोकसंख्येवर आधारित उद्दिष्टये दिली जातात.अंमलबजावणी मनपाच्या आस्थापनेवर अधिकारी व कर्मचा-यामार्फत करण्यात येते. काही बाबीमध्ये समाज प्रबोधनाची अत्यंत आवश्यकता असते व उद्दिष्टये | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पूर्ततेसाठी त्याचा फायदा मिळतो. उदा.जननी सुरक्षा योजना,प्रसवपुर्व गर्भलिंग तपासणी (P.C.PNDT ACT) याबाबत पथनाटय,माहितीपत्रिका,झोपडपट्टयांमध्ये साथीचे रोग आटोक्यात आणण्यात(किटकजन्य आजार) उदा.डेंगी,मलेरिया-जनतेला प्रबोधन देण्यात येऊन कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन केले जाते. | | |
| ४ | धन्वंतरी स्वास्थ्य योजना २०१३ | पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील कायमस्वरुपी कार्यरत असणा-या कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबियांना (पती पत्नी व २१ वर्षापर्यंतची २ अपत्ये) वैद्यकीय सुविधा पुरविल्या जातात तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही या सुविधेचा लाभ दिला जातो | | |
| ५ | सन्मा. नगरसदस्यांकरीता आरोग्य विमा योजना | आजी नगरसदस्य यांचेकरीता (पती-पत्नी व २ अपत्ये २१ वर्षापर्यंत) ५ लाख रकमेपर्यंत एक वर्ष कालावधीसाठी आरोग्य विमा योजना लागू करणेत आली आहे. | | |